"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

\- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

कोल्हापूर

# अ ह वा ल

## महात्मा गांधी , लालबहादूर शास्त्री जयंती व स्वच्छता अभियान उपक्रम

बुधवार दि.02.10.2024 रोजी विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कॉलेजच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात महात्मा गांधीजींची 155 वी जयंती त्यांच्या फोटोचे पूजन करून व त्यांच्या कार्याचा गौरव करून साजरी करण्यात आली. तसेच याच दिवशी लाल बहादूर शास्त्री यांचीही जयंती फोटो पूजनाने करण्यात आली. यावेळी कॉलेजचे प्राचार्य मा.डॉ.आर.आर.कुंभार यांच्या हस्ते दोन्ही महामानवांच्या फोटोला हार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली.

सदर कार्यक्रमावरील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कॉलेजचे प्रबंधक श्री आर. बी. जोग, ज्युनिअर व सिनिअर विभाग राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व सदस्य तसेच बहुसंख्येने या कार्यक्रमाला स्वयंसेवक उपस्थित होते.

त्यानंतर सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत सीनियर व ज्युनिअर राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी गांधीजींच्या कार्याला दुजोरा देण्यासाठी स्वच्छतेची मोहीम हाती घेतली. कॉलेज परिसरातील प्लास्टिक, कागदी बोळे व दगड गोटे तसेच अनावश्यक तन काढणे यासारखे कामे करून समाजाला स्वच्छतेचा संदेश दिला. एक कदम स्वच्छता की ओर या गांधीजींच्या संदेशाप्रमाणे स्वयंसेवकांनी समाजसेवी व्रत धारण करून आसपासची स्वच्छता केली व गांधीजींना आदरांजली दिली. महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या एकत्रित जयंती कार्यक्रमामुळे स्वयंसेवकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. सार्वजनिक सुट्टी असून देखील दूरदूरच्या गावातून स्वयंसेवक श्रमदानासाठी एकत्रित आले होते. कॉलेज परिसर, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था परिसर या ठिकाणची स्वच्छता करून झाल्यानंतर स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कॉलेजचे मा.प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. अशाप्रकारे हा जयंती कार्यक्रम व स्वच्छता अभियान उपक्रम मोठ्या थाटामाटात व उत्साहात पार पडला.

प्रा. एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती
स्वच्छता अभियान

दि. 2.10.2024









स्वच्छता अभियान

दि. 2.10.2024



